पुण्यात २४ तासांत ३ गोळीबाराच्या घटना

■ पुणे

पुण्याच्या सिंहगड पोलीस ठाणे हद्दीतील भूमकर चौकात काल मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास गोळीबार झाला. काडेपेटी मागितल्याच्या कारणातून दोन तरुणांमध्ये वाद होऊन ही गोळीबाराची घटना घडली. गणेश गायकवाड या तरुणावर गोळीबार झाला. गणेशच्या खांद्याला गोळी लागली. पुणे शहरात गेल्या २४ तासांत ३ गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. पहिल्या घटनेत हडपसर शेवाळेवाडी येथे व्यवसायिक स्पर्धेतून एका माजी सैनिकाने दुसऱ्या माजी सैनिकावर गोळीबार केला. त्यामध्ये एकजण जखमी झाला. दुसऱ्या घटनेत मंगळवारी सायंकाळच्या सुमारास पुण्यात एका व्यावसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न केला. धीरज दिनेशचंद्र आरगडे असे या गोळीबारातून बचावलेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. धीरज हे शहरातील जंगली महाराज रस्त्यावर असलेल्या वन प्लस शोरूमजवळ उभे होते.

हापूसने धरली कॅनिंगची वाट किलोला ३० रुपयांचा भाव

■ रत्नागिरी

हंगामाच्या सुरुवातीला चांगला दर मिळणाऱ्या हापूस आंब्याची आवक वाढल्यानंतर दरात घसरण झाली आहे. दुसऱ्या टप्प्यात आता स्थानिक बाजारपेठेत हापूस मोठ्या प्रमाणात दाखल झाला आहे. अशातच आता हापूसने कॅनिंगची वाट धरली आहे. मात्र, येथेही किलोमागे केवळ ३० रुपयेच दर मिळत आहे. कॅनिंगसाठीतरी दर ४० रुपये मिळवा, अशी मागणी आता बागायतदारांनी केली आहे.

फेब्रुवारीच्या मध्यात सुरू झालेला हापूस आंब्याचा हंगाम काही भागांमध्ये अंतिम टप्प्यात आला आहे. वाशीतील बाजार समितीमध्ये आवक वाढल्यामुळे दिवसेंदिवस हापूसच्या दरात घसरण होत आहे. त्यामुळे आता आंब्याने अंतिम टप्प्यातील कॅनिंगची वाट धरली आहे. वानर-माकडे, बदलते हवामान व चोरट्यांचा वावर अशा प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत आंबा बागायतदार आपला व्यवसाय करत आहेत. यावर्षी हंगामाची सुरुवात फेब्रुवारीमध्ये झाली. मार्चमध्येही कोकणातून बाजारात जाणाऱ्या पेट्यांची संख्या अधिक होती. सुरवातीला चांगला दर मिळत होता. मात्र आता आंब्याची आवक वाढल्यामुळे दर काही प्रमाणात घसरू लागला आहे. उन्हामुळे आंबा लवकर काढणी योग्य होत आहे. बाजारात आवक वाढली आहे. परिणामी, दर घसरला आहे. सुरवातीच्या टप्प्यात आलेल्या मोहोरामधून चांगले उत्पादन आले होते. त्याला बाजारात चांगला दर मिळाला. येत्या आठ दिवसात हा बहर संपेल. त्यानंतर आलेल्या मोहोरातील उत्पादन हाती येण्यासाठी बागायतदारांना थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. प्रतिकूल परिस्थितीमधून मार्ग काढत बागायतदार व्यवसाय करत आहेत. दुसऱ्या टप्प्यातील आंबा मे महिन्यामध्ये तयार होण्याची शक्यता आहे. त्यामधून मिळणारे उत्पादन हे पावसाच्या आगमनावर अवलंबून आहे. आंबा मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे वाशी बाजारातील दर उतरले असून, काही बागायतदार कमी दर्जाचा आंबा कॅनिंगसाठी देत आहेत.

अरुण गवळीच्या कन्येला भाजपाची महापौरपदाची भेट?

■ मुंबई

अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांची कन्या गीता गवळी यांना भाजपा मुंबईच्या महापौर बनवण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तशी घोषणा केली आहे. राहुल नार्वेकर दक्षिण मुंबईतून महायुतीचे संभाव्य उमेदवार आहेत. मात्र, त्यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. १४ एप्रिल रोजी त्यांनी अरुण गवळींच्या अखिल भारतीय सेनेच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात उपस्थिती लावली होती. यावेळी गीता गवळीदेखील उपस्थित होत्या. अरुण गवळींची सुटका करण्याचा निर्णय महायुतीने घेतल्याची जोरदार चर्चा आहे. अशातच मेळाव्यात नार्वेकरांनी गीता गवळी यांना मुंबईच्या महापौर करण्याचे आश्वासन दिले. महायुतीच्या या निर्णयाचा दक्षिण मुंबईतील उमेदवाराला नक्की फायदा होणार, अशा चर्चा आहेत.

बबली, नाची, डान्सर नवनीत राणा
खासदार संजय राऊतांची जीभ घसरली

■ अमरावती

निवडणूक प्रचारात एकमेकांची उणी-धुणी काढताना, काही नेते महिलांवर टीका करताना असभ्य व अश्लील भाषेत शेरेबाजी करतात. आज अमरावतीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारसभेत भाषण करताना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांची अशीच जीभ घसरली. त्यांनी महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांचा बबली, नाची , डान्सर अशा शब्दात उल्लेख केला. मातोश्रीला आव्हान देणाऱ्या बाईचा पराभव करणे हे आपले नैतिक कर्तव्य असल्याचे शिवसैनिकांना आवाहन केले.

आज अमरावती मधील महाविकास आघाडीचे उमेदवार वानखेडे यांच्या प्रचार सभेत बोलताना संजय राऊत भलतेच आक्रमक झाले होते. ते पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीची लढाई देशाची लढाई आहे. ही लढाई बळवंत वानखेडे आणि

नाची विरोधातील नाही. एका डान्सर विरोधातील नाही. एका बबली विरोधातील नाही, तर ही लढाई मोदी विरुद्ध महाराष्ट्र अशी असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. ही लढाई मोदी विरुद्ध उद्धव ठाकरे, मोदी विरुद्ध शरद पवार, मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे.

ज्या बाईने मातोश्रीला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. मातोश्रीमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. मातोश्रीविषयी अपशब्द वापरले. हिंदुत्वाविषयी अपशब्द वापरले, त्या बाईचा पराभव करणे हे शिवसेनेचे पहिले नैतिक कर्तव्य असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले. अशा बाईच्या विरोधात शिवसैनिकांनी काम करायला हवे. तिच्या पराभवात शिवसेनेचे योगदान मोठे असले पाहिजे, हा बाळासाहेब ठाकरे यांचा आदेश असल्याचे लक्षात ठेवा, असे देखील खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.त्यामुळे आता नवनीत राणा संजय राऊत यांच्या विरुद्ध काय बोलतात, अपशब्द वापरल्याबद्दल कोणते पाऊल उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बॅनरवर राज ठाकरेंचा फोटो नसल्याने मनसैनिक संतापले

■ लातूर

लातूर लोकसभा मतदारसंघात भाजपाच्या बॅनरवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा फोटो नसल्याचे मनसेचे स्थानिक पदाधिकारी आक्रमक झाले. राज ठाकरे यांना योग्य सन्मान दिला नाही, तर आम्ही तुम्हाला जागा दाखवून देऊ, असा इशारा मनसेचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिला. त्यामुळे आता लातूरमध्ये महायुतीत तणाव निर्माण झाला.

प्रचारात सहभागी झालेले मनसेचे स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी आक्रमक झाल्यानंतर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, राज ठाकरेंच्या मनसेने पाठिंबा दिल्यामुळे महायुतीला बळ मिळाले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. भाजपाच्या बॅनरवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा फोटो नाही, ही चूक स्थानिक स्तरावर झाली आहे. ती दुरुस्त करण्यात येईल.

सोलापुरात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी रेड्यावरुन एन्ट्री

राम गायकवाड यांच्या पराक्रमाची सर्वत्र चर्चा

■ सोलापूर

माढा लोकसभेचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आज एक उमेदवार चक्क रेड्यावर बसून पोशाख आणि रेड्यावर बसून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या या उमेदवाराची सर्वत्र चर्चा होत आहे. राम गायकवाड असे या

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दाखल झाला. उमेदवाराच्या या हटके एन्ट्रीने सर्वच चकित झाले. यमाचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराचे नाव आहे. राम गायकवाड हे मूळचे पंढरपुरचे असून माढ्यातून ते लोकसभेच्या रिंगणात उतरत आहेत. ओबीसी प्रवर्गातून टिकणारे मराठा आरक्षण मिळावे, हा मुद्दा घेऊन राम गायकवाड हे निवडणुकीला सामोरे जाणार आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना गायकवाड म्हणाले की, देशामध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार संपला पाहिजे. ओबीसीतून मराठा आरक्षण मिळाले पाहिजे. देशात फक्त स्वार्थासाठी राजकारण सुरू आहे. सामान्यांना नेते घाबरत नाहीत. त्यामुळे आता शेवटचे टोक म्हणजे यमाला घाबरतील म्हणून अशा रूपात आलो आहे.

बँकांमधील कर्जाचे नियम १ ऑक्टोबरपासून बदलणार

■ मुंबई

१ ऑक्टोबरपासून रिझर्व्ह बँके (आरबीआय) कडून कर्जाचे नियम बदलले जाणार आहेत. आरबीआयने सर्व बँका आणि सर्व नॉन-बँकिंग वित्त संस्थांना यासंदर्भात सूचना जारी केल्या आहेत. यामध्ये त्यांना नवीन नियमांनुसारच कर्ज द्यावे लागेल. तसेच कर्ज देताना ते ग्राहकांपासून कोणत्याही अटी लपवू शकणार नाहीत. तसेच या बँकांना व्याजासह, ग्राहकांना इतर छुप्या खर्चाची माहितीदेखील द्यावी लागणार आहे. ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने आरबीआय आता कर्ज नियमात बदल करणार आहे. त्यामुळे पारदर्शकताही वाढेल. यानुसार आता बँकांना ग्राहकांना सर्व छुप्या अटींची माहिती आधीच द्यावी लागणार आहे.

अनेक बँका ग्राहकांना कर्ज देताना शब्दांच्या जाळ्यात अडकवून लुबाडतात. याबाबत आलेल्या तक्रारींमुळे आरबीआयने हा निर्णय घेतला आहे. मात्र केवळ किरकोळ आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी दिलेल्या कर्जासाठी कर्जाचे नियम बदलतणार आहेत.

शिवसेना ठाकरे गटाला धक्का
चंद्रकांत खैरेंची निवृत्तीची घोषणा

■ छ. संभाजी नगर

शिवसेना ठाकरे गटाचे संभाजीनगरचे माजी खासदार आणि मविआचे विद्यमान उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज त्यांच्या राजकीय निवृत्तीची घोषणा केली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये अंबादास दानवेंना तिकीट दिले जाणार अशा चर्चा रंगल्या होत्या. अंबादास दानवे यांनी तशी इच्छाही बोलून दाखवली होती. मात्र कुणालाही तिकीट दिले तरीही आम्ही त्या उमेदवारासाठी प्रचार करू असेही त्यांनी सांगितले. चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आल्यानंतर अंबादास दानवे काहीसे नाराजही झाले होते, पण त्यानंतर त्यांनी जोमाने प्रचार सुरू केला. या सगळ्या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषद घेऊन चंद्रकांत खैरेंनी आपल्या राजकीय निवृत्तीची घोषणा केली आहे. तसेच त्यांनी भाजपा आणि एकनाथ शिंदेंवरही जोरदार टीका केली आहे.

आज पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, २०२९ ची निवडणूक मी लढवणार नाही. पुढील निवडणुकांमध्ये पक्ष देईल त्याच्यासाठी काम करीन. ते पुढे म्हणाले, भाजपाने सत्तेसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष फोडले. सगळे काही देऊनही एकनाथ शिंदेंनी गद्दारी केली. या सगळ्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे. लोकसभेची निवडणूक गद्दार विरुद्ध निष्ठावंत अशी आहे.

टपाली मतपत्रिका गोपनियतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्या

■ रत्नागिरी

घरी जाऊन मतदान घेताना गोपनियतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान केंद्राध्यक्षांनी याबाबत काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे, असे मार्गदर्शन उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड यांनी निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांना केले.

उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकाऱ्यांची सूचना

स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात निवडणूक कर्तव्यावर नेमलेले अधिकारी, कर्मचारी, अत्यावश्यक सेवेतील मतदारांना, तसेच ८५ वर्षावरील मतदार, दिव्यांग मतदार यांच्याकरिता विधानसभा मतदार संघातील नोडल पोस्टल कर्मचारी यांचे प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले होते. तहसिलदार तेजस्विनी पाटील यांनी संगणकीय सादरीकरण करुन सविस्तर प्रशिक्षण दिले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी गायकवाड यांनी विशेष मार्गदर्शन केले. ते म्हणाले, घरी जाऊन मतदान घेताना सुक्ष्म निरीक्षक, पोलीस बंदोबस्त, चित्रीकरण तसेच केंद्रस्तरीय अधिकारी असणार आहेत. उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी देखील उपस्थितीत असणार आहेत. त्यामुळे घरी जाऊन मतदान घेताना गोपनियतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावयाची आहे. याबाबत मतदान केंद्राध्यक्षांनी काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. मतपत्रिकेवर मतदान कसे नोंद करावयाचे आहे, हे मतदारांना सांगावयाचे आहे. त्याचबरोबर त्याची घडी कशी घालायची याबाबतही त्यांना कल्पना द्यायची आहे.या प्रशिक्षणासाठी जिल्हा नियोजन अधिकारी सत्यविनायक मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीकांत हावळे, तहसिलदार राजाराम म्हात्रे, चिपळूणचे तहसिलदार प्रविण लोकरे आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सांगलीतील अपघातात ५ ठार

■ सांगली

सांगलीच्या विजयपूर-गुहागर महामार्गावर वऱ्हाड्यांच्या बसला जीपने धडक दिल्याने अपघात झाला. काल रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात ५ जण ठार झाले असून, १५ जण जखमी झाले आहेत. जखमींना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या अपघातातील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वऱ्हाड्यांची बस लग्नसमारंभ उरकून परतत होती. या बसमधून १८ ते २० जण प्रवास करत होते. चालकाचे जीपवरील नियंत्रण सुटले आणि ही जीप बसला धडकली, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या अपघातात जीपचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना रुग्णालयात ठादाखल केले.

काँग्रेस उमेदवाराचा वैयक्तिक जाहिरनामा प्रसिध्द

■ इंफाळ

काँग्रेसने इनर मणिपूर मतदारसंघातून अंगोम्चा बिमोल अकोइजाम यांना उमेदवारी दिली आहे. तर अकोइजाम यांच्याविरोधात भाजपाने थौनओजम बसंत कुमार सिंह यांना उमेदवारी दिली आहे. लोकसभेसाठी काँग्रेसने ५ एप्रिल रोजी पक्षाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला होता. यामध्ये अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. मात्र आता इनर मणिपूरचे उमेदवार अकोइजाम यांनी लोकसभेसाठी त्यांचा वैयक्तिक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यात अकोइजाम यांनी म्हटले आहे की, १५ एप्रिल रोजी अमित शहा मणिपूरमध्ये आले होते.

जाहीर सूचना

वसंत इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑप. प्रिमायसेस सोसायटी लि., पत्ता - साकिविहार रोड, साकीनाका, मुंबई ४०००७२च्या सदस्या आणि संस्थेच्या इमारतीमधील गाळा क्र. बी-०२ आणि संबंधित भाग प्रमाणपत्र क्र. २ च्या धारक श्रीमती दर्शन कौर यांचे दि. १५.०६.२०२० रोजी निधन झाले. दिवंगत सदस्याचे पती श्री. हरजित सिंग यांनी संस्थेकडे दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याकरिता विनंती केली आहे.

संस्था याद्वारे दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार किंवा दावेदारांकडून/आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये, त्यांच्या/तिच्या/त्यांच्या दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास असलेल्या दावे/आक्षेपांच्या समर्थनार्थ दस्तऐवज आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहेत. दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास दावे/आक्षेप, जर असल्यास, संस्थेस प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधींअंतर्गत दिलेल्या पद्धतीने त्यावर निर्णय घेण्यात येईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधींची प्रत दावेदार/आक्षेपदारांना पाहणीकरिता सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीच्या दिनांकापर्यंत स. १०.३० ते ११.३० दरम्यान संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

वसंत इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑप.
प्रिमायसेस सोसायटी लि.
करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव

ठिकाणः मुंबई
दिनांकः १९ एप्रिल, २०२४

Sou. Devibai Narayandas Chhabada Rural Education Society, Satara

Late N.B.Chhabada
Military School, Raigaon, Satara

ADMISSIONS OPEN

5th to 10th & 11th/12th SCIENCE
(Residential, Co-education)

-: Adress :-

S.No.259, A/P : Raigaon, Tal. Jaoli, Dist.Satara - 415020
Mob : 9822025900 / 9881373735
Website : www.sdncedu.com email : sdncres1999@gmail.com

THE MAHARASHTRA STATE CO-OP. BANK LTD., MUMBAI
(Incorporating The Vidarbha Co-op. Bank Ltd.)
Scheduled Bank
Sir Vithaldas Thackersey Smruti Bhavan,
9, Maharashtra Chamber of Commerce Lane, Fort, Mumbai - 400 001

TENDER NOTICE

We invite Sealed Quotation for **"INTERIOR FURNISHING, ELECTRICAL, UPS, DATA CABELING & AIR CONDITIONERS WORKAT OUR PRABHADEVI BRANCH."**
Last date of Submission : 09.05.2024
For More details, Please Visit our website http://www.mscbank.com

Date : 19.04.2024
Place : Mumbai

Sd/-
(Dilip N. Dighe)
MANAGING DIRECTOR

भारतात विकल्या जाणाऱ्या नेस्लेच्या बेबी फूडमध्ये साखरेचे प्रमाण जास्त

पब्लिक आयच्या अहवालात उघड

■ नवी दिल्ली

बाळांचा आहार या क्षेत्रात भारतात २० हजार कोटींची वार्षिक उलाढाल असलेल्या नेस्ले इंडियाच्या बेबी फूड उत्पादनांमध्ये जास्त प्रमाणात साखर असल्याचे पब्लिक आयने केलेल्या तपासणीत उघड झाले आहे.

नेस्लेची बेबी फूड उत्पादने भारतात मोठ्या प्रमाणात विकली जातात. विशेष म्हणजे, ब्रिटन, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स आणि इतर विकसित देशांमध्ये नेस्लेची हीच उत्पादने साखरमुक्त आहेत. बाळांच्या उत्पादनांमध्ये जास्त साखर घालणे हे धोकादायक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तरीही भारत, आफ्रिका आणि काही विकसनशील देशात उत्पादने विकताना नेस्ले साखरेचे प्रमाण वाढवते. भारतात नेस्लेच्या १५ सेरेलॅक उत्पादनांच्या प्रत्येक सर्व्हिंगमध्ये सरासरी ३ ग्रॅम इतकी साखर असल्याचे उघडकीस आले आहे. म्हणजे २५ ग्रॅम पावडरीत ८९ टक्के साखर असते तर इथिओपिया आणि थायलंड या देशांमध्ये या उत्पादनात सुमारे ६ ग्रॅम इतकी साखर आहे. या उत्पादनांच्या पॅकेजिंगवरील माहितीमध्ये साखरेचे प्रमाण स्पष्ट लिहिलेले नसते. नेस्ले आपल्या उत्पादनांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि इतर पोषक तत्वे ठळकपणे अधोरेखित करते. मात्र त्यात साखरेचे प्रमाण जास्त असल्याचे सांगत नाही, असे पब्लिक आयच्या अहवालात म्हटले आहे.

सलग चौथ्या दिवशीही शेअर बाजारात घसरण

■ मुंबई

इराण आणि इस्त्रायलमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे शेअर बाजारात आज सलग चौथ्या दिवशी विक्री झाल्याने सेन्सेक्स ४५४ अंकांनी घसरून ७२,४८८ वर बंद झाला. निफ्टीही १५२ अंकांनी घसरून २१,९९५ वर आला.

बाजारात नेस्ले इंडियाची सर्वात मोठी घसरण झाली. फार्मा आणि बँकिंग क्षेत्रातील तेजीलाही ब्रेक लागला. शेअर बाजारात सकाळी तेजी होती ,पण शेवटच्या क्षणी सेन्सेक्स आणि निफ्टी घसरणीसह बंद झाले.

अहिल्यादेवी होळकरांचे वंशज शरद पवार गटात जाणार

■ पुणे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह होळकर हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश होण्याची शक्यता आहे. याशिवाय पक्षाच्या युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लागणार असल्याची चर्चा आहे. याशिवाय शरद पवार गटाच्या स्टार प्रचारकांच्या यादीतही त्यांच्या नावाचा समावेश होणार आहे.

पुण्यात भूषणसिंह होळकर यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, पक्षाकडून ज्या उमेदवारांचे अर्ज भरले जाणार आहेत. तिथे शरद पवार यांच्यासोबत मी जाणार आहे. गेल्या १० वर्षांत देशाची झालेली दिशाभूल पुन्हा होऊ नये ही महाविकास आघाडीची भूमिका जनतेपर्यंत पोहोचवायची आहे. शरद पवार यांनी राज्याच्या हितासाठी केलेली कामे आम्ही जनतेपर्यंत पोहोचवणार आहोत.

फॉर्म ए
सार्वजनिक उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ,
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

कोशिका बायोसायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

प्रस्तुत तपशिल		
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	कोशिका बायोसायन्स प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	२७ डिसेंबर, २०१७
३	प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे.	कंपनी निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. / मयादित दायित्व ओळख क्र.	U74999MH2017PTC303371
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	ए/५०३, वेस्टर्न एज ॥, सीसीआय कंपाऊंड, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, बोरीवली पूर्व, मुंबई - ४०००६६.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख	१६ एप्रिल, २०२४
७	नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख	१३ ऑक्टोबर, २०२४
८	अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	श्री. नितीन ओम कोठारी IBBI/IPA-001/IP-P-02310/2020-2021/13477
९	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	५ए - ३०१, अलिका नगर, लोखंडवाला टाऊनशीप, कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१, महाराष्ट्र. ई-मेल : cakotharico@gmail.com
१०	अंतरिम विभेदन व्यवसायिकासोबत संपर्कासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल	५ए - ३०१, अलिका नगर, लोखंडवाला टाऊनशीप, कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१, महाराष्ट्र. ई-मेल : kbpl.cirp@outlook.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	३०-एप्रिल-२०२४
१२	अंतरिम विभेदन व्यवसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग	लागू नाही
१३	प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यवसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे :	वेबलिंकः (अ) https://ibbi.gov.in/home/downloads (ब) लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **कोशिका बायोसायन्स प्रायव्हेट लिमिटेडची** कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया १६ एप्रिल, २०२४ रोजी प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे.

कोशिका बायोसायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना, याद्वारे त्याचे दावे पुराव्यांसोबत ३० एप्रिल, २०२४ रोजी किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यवसायिकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

वित्तीय धनकोनी त्यांच्या पुराव्यासोबतचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे प्रस्तुत करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे पुराव्यासोबतचे दावे व्यक्तीशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सादर करू शकतील.

खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

दिनांक : १९ एप्रिल, २०२४
स्थळ : मुंबई

सही/-
नितीन ओम कोठारी
रजि. नं.: IBBI/IPA-001/IP-P-02310/2020-2021/13477
अंतरीम विभेदन व्यवसायिक

फॉर्म ए
सार्वजनिक उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ,
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

ट्रूव्हॅल्यू इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

प्रस्तुत तपशिल		
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	ट्रूव्हॅल्यू इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	०९/१२/१९९९
३	प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे.	कंपनी निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. / मयादित दायित्व ओळख क्र.	U74210MH1999PLCT22998
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	२०३, लोहा भवन, कर्नाक बंदर, मस्जिद, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००००१.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख	**१६/०४/२०२४** रोजी सीआयआरपी आदेश घोषित करण्यात आला आणि कळविण्यात आला.
७	नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख	**१३/१०/२०२४** (आदेशाच्या घोषणा दिनांकापासून १८० दिवस)
८	अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	**नाव** - आयपी. मेघा अग्रवाल (सिनर्जी इन्सॉल्वंसी प्रोफेशनल्स एलएलपीमध्ये भागीदार) रजि.क्र.- IBBI/IPA-001/IP-P01456/2018-2019/12272
९	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	पत्ता : ००१, काँग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये शिवरंजिनी अपार्टमेंट्स, काँग्रेस नगर, नागपूर - ४४००१२ (म. रा.) ई-मेल : ip.meghaagrawal@gmail.com
१०	अंतरिम विभेदन व्यवसायिकासोबत संपर्कासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल	**सिनर्जी इन्सॉल्वंसी प्रोफेशनल्स एलएलपी** प्लॉट क्र. ७२, अंजनेया निवास, ड्यू ट्रीनीटी हॉस्पिटल, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिराच्या जवळ, वर्धा रोड, नागपूर ४४००१५. ई-मेल : cirp.truevalue@gmail.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	३०/०४/२०२४
१२	अंतरिम विभेदन व्यवसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग	लागू नाही
१३	प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यवसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे :	वेबलिंकः (अ) https://ibbi.gov.in/home/downloads भौतिक पत्ताः (ब) लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **ट्रूव्हॅल्यू इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेडची** कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे. (१६.०४.२०२४ दिनांकित आदेश, १६.०४.२०२४ रोजी आदेश प्राप्त झाला/कळविण्यात आला)

ट्रूव्हॅल्यू इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना, याद्वारे त्याचे दावे पुराव्यांसोबत रोजी किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यवसायिकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

वित्तीय धनकोनी त्यांच्या पुराव्यासोबतचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे प्रस्तुत करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे पुराव्यासोबतचे दावे व्यक्तीशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सादर करू शकतील.

खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

सही/-
आयपी मेघा अग्रवाल
ट्रूव्हॅल्यू इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेडसाठी अंतरिम विभेदन व्यवसायिक
IBBI/IPA-001/IP-P01456/2018-2019/12272
एएफए वैधता - ०२.१०.२०२४ पर्यंत, **ई-मेल :** cirp.truevalue@gmail.com
आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता :- ००१, काँग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये शिवरंजिनी अपार्टमेंट्स, काँग्रेस नगर, नागपूर - ४४००१२
ई-मेल : ip.meghaagrawal@gmail.com

दिनांक : १९.०४.२०२४
स्थळ : नागपूर